अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# भवितव्य नाकारणाऱ्या प्रवेश परीक्षा

आपल्या देशातील तरुणांच्या किंवा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोण कसा खेळ करील हे काही सांगता येत नाही. खरे तर प्राथमिक शिक्षणापासून हा खेळ सुरू होतो. शाळांमधला प्रवेश आणि प्रत्येक शाळेच्या कारभाराची वेगवेगळी तऱ्हा विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबाबत अनिश्चितता निर्माण करते. मग राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा वेगळ्या केंद्रीय शिक्षण म्हणजेच सीबीएसी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा वेगळ्या. आता त्यात आयसीएससी म्हणजे थेट आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम शिकविण्याचा दावा करणाऱ्या शाळा वेगळ्या अशा तऱ्हेवाईक आणि असमान शिक्षणाचा त्यात समावेश होतो. या सगळ्या अडथळ्यांना किंवा असमान विषय अनिश्चित परिस्थितीशी सामना करीत करीत तो विद्यार्थी दहावी-बारावीपर्यंत पोहोचतो. कष्ट करून चांगले गुण मिळविण्याचा प्रयत्न करतो. परंतु तिथेसुद्धा गुणांची कदर होण्यापेक्षा महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी त्याला अक्षरश: शरणागती पत्करावी लागते. विद्यार्थ्यांच्या गुणापेक्षा त्या-त्या शाळा, कॉलेजचा मान जास्त महत्त्वाचा ठरतो. बारावी परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना गुणवत्ताप्राप्त गुलामगिरीचाच अनुभव येतो. बारावीचे संपूर्ण वर्ष विद्यार्थी जीवाचे रान करतो. कारण बारावीनंतर त्याचे खऱ्या अर्थाने भवितव्य किंवा करिअर नक्की होणार असते. सध्या तर इंजिनिअर, डॉक्टर यासारख्या किंवा आयआयटीसारख्या क्षेत्रात करिअर करणाऱ्यांची झुंबड उडते. यासाठी प्रत्यक्ष बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्याने चांगले म्हणजे ८०-९० टक्क्यांच्यावरच मार्क्स मिळविणे गरजेचे ठरते. परंतु एवढे मार्क्स मिळवूनही त्याचा उपयोग होत नाही. कारण सीईटी अथवा जेईईसारख्या प्रवेश परीक्षांमध्ये त्याने चांगले गुण मिळविणे आवश्यक ठरते. मग बारावीच्या परीक्षेत राबराब राबून ९० टक्के मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला सीईटी किंवा जीईईमध्ये कमी गुण मिळाले तर त्याच्या करिअरचे मार्गच बंद होतात. नाइलाजाने आणि नाराजीने त्याला एखाद्या अभ्यासक्रमातील प्रवेश घ्यावा लागतो. खरे तर बारावीत ७०-८० टक्के गुण मिळविणारा कोणताही विद्यार्थी त्याच सीईटी अथवा जेईई परीक्षेत किमान तशीच चांगली कामगिरी दाखवू शकतो. परंतु तिथल्या निगेटिव्ह गुणपद्धतीने अक्षरश: लाखो विद्यार्थी अपात्र ठरविले जातात. गुणवत्ता असून निगेटिव्ह मार्कांमुळे विद्यार्थ्यांच्या चांगल्या भवितव्याला नाकारण्याचा खेळ खेळला जातो.

## प्रवेश परीक्षांचे ओझे हवे कशाला

एकीकडे शिक्षण हा प्रत्येकाचा अधिकार आहे, अशी घटनात्मक तरतूद करायची, परंतु तेच शिक्षण मिळविण्यासाठी लोकांची कसोटी पाहायची ही विसंगतीच ठरते. जर इच्छा, जिद्द, कष्ट करण्याची तयारी असताना विद्यार्थ्यांना, तरुणांना त्यांच्या मनासारखे शिक्षण घेता येत नसेल तर तो त्यांच्यावर घोर अन्याय ठरतो. दहावीच्या परीक्षेत बेस्ट फाईव्हसारखा पर्याय देऊन उत्तीर्ण होणाऱ्यांची आणि अधिकाधिक गुणवत्ताधारकांची संख्या वाढवायची पण बारावीत मात्र प्रवेश परीक्षांचे ओझे लादून त्याच गुणवत्तेला केराची टोपली दाखवायची, असा दुटप्पीपणा सुरू आहे. यंदा तर सीईटी आणि जेईई म्हणजे मेडिकल अथवा इंजिनीअरिंगसाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षांमध्ये निगेटिव्ह मार्क्स देण्याची नवी पद्धत राबवली गेली. जी सीईटी गेल्यावर्षी साध्या स्वरूपात होती आणि केवळ तीनशे गुणांची होती ती यावेळी ७०० गुणांची ठेवून विद्यार्थ्यांच्या तोंडाला फेस आणला गेला. विद्यार्थ्यांनी बारावीच्या ७०० आणि सीईटीच्या ७०० अशा चौदाशे गुणांचा अभ्यास केवळ ८ महिन्यांत कसा पूर्ण करायचा. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा, त्याच्या शारीरिक, मानसिक क्षमतेचा कोणताही विचारच करायचा नाही. कोणाच्या तरी बिनडोकपणातून या कल्पना बाहेर येतात आणि नोकरशाहीतून लोकांच्या माथी मारल्या जातात. पालक, विद्यार्थी यांना गरज असल्याने आणि सरकारी झुंडशाहीविरुद्ध लढायला वेळ नसल्याने ते या सर्वांचा मुकाटपणे स्वीकार करतात. प्रामुख्याने महाराष्ट्रातला गुणवत्ताधारक, कष्टाळू तरुणांच्या भविष्याचा खेळखंडोबा करणाऱ्या प्रवेश परीक्षा एकतर ताबडतोब बंद झाल्या पाहिजेत. किंवा त्यातली निगेटिव्ह गुणपद्धती बदलून त्या फक्त १५० गुणांच्या असल्या पाहिजे.

## फक्त ५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

सरकारचे शिक्षण खाते डोके ठिकाणावर ठेवून जर काम करू लागले तर महाराष्ट्रातल्या हुशार विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा खरोखर सकारात्मक आणि विधायक उपयोग होऊ शकेल. जर का नकारात्मक गुणपद्धतीचा आग्रह धरला तर त्यातून नुकसानच पदरी पडेल. प्रवेश परीक्षा असते ती केवळ त्या विद्यार्थ्याची त्या-त्या विषयातली रूची, आवड आणि क्षमता बघणारी असली पाहिजे. ७०० मार्कांची प्रवेश परीक्षा घेऊन या कोवळ्या वयातील विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा भुगा करू नका! यंदा या नकारात्मक किंवा निगेटिव्ह गुणपद्धतीमुळे आणि ७०० गुणांच्या अभ्यासक्रमामुळे अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड वाढले. गेल्या पाच वर्षांतल्या प्रवेश परीक्षांमध्ये जेवढे विद्यार्थी नापास झाले नसतील तेवढे यावर्षीच्या प्रवेश परीक्षांमध्ये नापास झाले. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी यंदा १ लाख ४८ हजार विद्यार्थ्यांनी सीईटी म्हणजेच नीट नावाची प्रवेश परीक्षा दिली. त्यापैकी ८ हजार ११६ विद्यार्थीच गुणवत्ताधारक असल्याचे या परीक्षा घेणाऱ्यांचे म्हणणे आहे. म्हणजे फक्त पाच टक्के विद्यार्थीच त्यात पास झाले. हे जर प्रवेश परीक्षांचे फलित असेल तर ती प्रवेश परीक्षा ठरतच नाही. ती विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या अभ्यासक्रमातून बाहेर फेकणारी जबरदस्ती ठरते ही शिक्षणातली सरकारी जुलूमशाहीच म्हणायला हवी. वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमी आहेत. म्हणून विद्यार्थीच अपात्र ठरविण्याचा हा अकबरी कारभार काय उपयोगाचा. परदेशामध्ये ८ वी ९ वीपासूनच विद्यार्थ्याला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात प्रवेश दिला जातो. त्याचा कल आणि क्षमता पाहून त्याचे भवितव्य घडविण्याचे काम सरकार आणि शाळा करतात. भारतात मात्र विद्यार्थ्याला आपले भवितव्य सरकारी भरोशावर सोडून द्यावे लागते. प्रवेश परीक्षांच्या नावाखाली चालणारा आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा जुलमी प्रकार थांबला पाहिजे. प्रवेश परीक्षा पद्धत सोपी आणि सुटसुटीत असली पाहिजे. त्याहीपेक्षा बारावीतल्या ग्रुपमधल्या मार्कांच्या आधारावर प्रवेश देण्याची सोपीपद्धत राबविली पाहिजे. व्यक्ती किंवा समाजाला शिक्षण सहज साध्य व्हावे. ते जुलमी असता कामा नये.